

कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी



श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित

# संगमेश्वर कॉलेज
# सोलापूर

# प्रतिभासंगम

वर्ष तिसरे । अंक ६वा । एप्रिल २०२१ ते मार्च २०२२

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित...
संगमेश्वर कॉलेज,सोलापूर



प्रेरणास्थान

# प्रतिभासंगम

**संपादक** – धर्मराज काडादी

**सहसंपादक** - प्रा. संतोष पवार
प्रा. शिवराज पाटील

**समन्वय समिती –**
प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य
उपप्राचार्य आनंद हुली
प्रा. एस .जे.आवटे
प्रा.दीपक पाटील
प्राचार्य गायत्री कुलकर्णी

**मुखपृष्ठ –** सचिन क्षीरसागर (विराक्षी)

**सजावट व मांडणी –** प्रदीप कोडगीमठ
रामचंद्र कुलकर्णी

**मुद्रक प्रकाशक -**
कल्पकला प्रिंटिंग प्रेस,
होटगी रोड, सोलापूर.

**संपर्क** – 0217/2600481 /82
**ई–मेल –**
pratibhasangam@sangameshwarcollege.in
**वेबसाईट** -www.sangameshwarcollege.in

## संपादकीय ...

'प्रतिभासंगम'च्या अंकाचे हे तिसरे वर्ष असून कोविड काळात ऑनलाईन विश्व जसे जवळ त्यांचे स्थित्यंतरे सांगणारा आहे.

या काळात शिक्षण न थांबता अविरत चालू राहिले. क्रीडांगणावरील ताऱ्यांची काळजी घेणं हे आपलं आद्यकर्तव्य या हेतूने खेळाडूंचे मैदानावरील सातत्य याबरोबरच आहार व्यवस्थापन याविषयी ऑनलाइन सत्र झाले. योगमुद्राद्वारे शरीर सुदृढ बनते हे प्रात्यक्षिकातून धनंजय सूर्यवंशी यांनी सांगितलं. जलसंधारण दिनानिमित्त भूगोल विभागाने डॉ. प्रदीप पुरंदरे यांचे व्याख्यान आयोजित केले. युवकांना कृषी पर्यटनात कोणत्या संधी आहेत हे सोनाली जाधव यांच्या मुलाखतीतून उमजले. आंतरराष्ट्रीय योग दिन २०२१ च्या निमित्ताने जिमखाना विभाग प्रमुख आनंद चव्हाण यांचे प्रात्यक्षिक झाले. २३ जून ऑलंपिक दिनानिमित्त क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर व्याख्यान झाले.

ग्रंथालय विभागाकडून वाचन अभिरुची वृद्धिंगत होण्यासाठी डॉ. संपत कुमार ( तुमकुर विद्यापीठ,कर्नाटक) यांचे मार्गदर्शन झाले. इयत्ता बारावीचा निकाल यंदाच्या वर्षी शंभर टक्के लागला. भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव ७५ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात कॉलेजच्या प्रांगणात साजरा झाला. कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीदिनी झालेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मुंबईचा वृषभ चौधरी सर्वप्रथम आला. या सगळ्या ऑनलाइन कार्यक्रमांचे व्हिडिओज आपल्या SES.sagameshwarcollegeया यूट्यूब वाहिनीवर आहेत.

ग्रंथराज ज्ञानेश्वरी परिष्करण दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन ग्रंथालयात झाले. कॉलेजच्या 68 वा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या उपस्थितीत झाला. बीकॉम मार्केटिंग, बीए नागरी सेवा परीक्षा यासंदर्भातले निवेदनही या काळात प्रसिद्ध झाले. कॉलेज स्तरावरील Covid-19 प्रबोधनासाठी मोफत लसीकरणाचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन सचिव मा. धर्मराज काडादी यांच्या हस्ते झाले.

संगमेश्वरच्या सहा खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड झाली. खगोलातील आगाध माहितीचा शोध घ्या.असे प्रतिपादन व्यंकटेश गंभीर यांनी केले, ते विज्ञान मंडळ उद्घाटनात बोलत होते. कंपनी सेक्रेटरी परीक्षेत समृद्धी गुंड हिने यश मिळवले. एमएचटी-सीईटी परीक्षेत उज्वल निकालाची परंपरा संगमेश्वरने कायम राखली. तरुणांनी पोलिसातील करियर माहीत करून घ्यावे या उद्देशाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर पाटील यांना निमंत्रित करण्यात आलं होतं.

क्रीडा क्षेत्रातील करियर वर प्रा. डॉ. अनिल कांबळे यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आरोग्य जागर या शिबिराचं आयोजन केलं होतं. मातृभूमीची सेवा यांची एनएनसीतून होते त्यासाठी सज्ज राहा असे ब्रिगेडियर आर. के. गायकवाड यांनी सांगितले. सीए परीक्षेत कॉलेजच्या सात विद्यार्थ्यांनी यश मिळवले. मराठी विभागाच्या वतीने भाषा पंधरवडा निमित्त डॉक्टर पुरुषोत्तम काळे यांचे व्याख्यान झाले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त डॉ. जगतानंद भटकर यांचे व्याख्यान झाले. हे कार्यक्रम आपल्यासाठी युट्युब वाहिनीवर उपलब्ध आहेत. डिजिटल तंत्राचा वापर करत वर्षभरातील ठळक कार्यक्रमांची नोंद या अंकात झाली आहेत हे नवे माध्यम निश्चितच विद्यार्थी-शिक्षक संशोधकांना आवडेल असा विश्वास वाटतो.

**- संपादकीय मंडळ**

# खेळाडूंचे मैदानावरील सातत्य .सरावाबरोबच आहार, व्यवस्थापन महत्वाचे डॉ. किरण पाठक

## जागतिक आरोग्यदिना निमित्त संगमेश्वर कॉलेजमध्ये जिमखाना विभागाचे व्याख्यान

**सोलपूर ( प्रतिनिधी )** ''खेळ कोणताही असो खेळाडूंचे मैदानावरील सातत्य .सरावाबरोबच आहार, व्यवस्थापन महत्वाचे आहे.त्यासाठी पालक - शिक्षकांसोबत खेळाडूंनी सजग राहवे. तरच आपल्या आवडीच्या खेळात आपण अव्व्लस्थानी राहू शकतो'' असे मार्गदर्शन डॉ. किरण पाठक (एम.डी.आयुर्वेद ) यांनी केले.त्या श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे , संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त),सोलापूर यांच्या वतीने जागतिक आरोग्य दिनानिमित्त, जिमखाना विभाग आयोजित दूरदृष्टी प्रणालीच्या आरोग्यम धनसंपदा या विषयावरील व्याख्यानात बोलत होत्या. बुधवार दि. 7 एप्रिल 2021 रोजी सकाळी 10.15 वाजता कॉलेजच्या युट्युब स्टुडिओमधून हा कार्यक्रम थेट प्रसारित झाला. या प्रसंगी अध्यक्षस्थानी - प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य या होत्या.तर प्रा. आनंद चव्हाण (जिमखाना विभागप्रमुख ) उपस्थित होते.

त्या पुढे म्हणाल्या की,खेळाडूंचे मानसिक स्वास्थही महत्वाचे असते त्यासाठी योग्य प्राणायाम याची जोड द्यावी. त्यामुळे ताण तणावाचे योग्य व्यवस्थापन होते.मुलींनी मैदानावरील खेळात सहभाग वाढवावा. फास्ट फूडच्या जमान्यात आपला पारंपरिक आहार जपला पाहिजे. खेळातील ग्लॅमर आपल्याला आकर्षित करते मात्र कठोर मेहनतीची तयारीही आपण ठेवली आपण यशस्वी होऊ शकतो. आहार, वेळेचे व्यवस्थापन या सोबत क्रीडांगणारील घडामोडींचे विवेचन करत शारीरिक तंदुरीस्ती उत्तम राखण्यासाठी डॉ. पाठक यांनी उदाहरणासह मार्गदर्शन केले.

या व्याख्यानात केंद्र आणि राज्य शासनाने केलेल्याआव्हानानुसार कोरोनाच्या या काळातील लसीकरणात

जनतेचा सहभाग वाढवण्यासाठी तसेच कोरोनापासून बचावासाठी नियमनाचे पालन करण्यासाठी कॉलेजच्या वतीने आवाहन केले गेले.

.



प्रारंभी कॉलेज जिमखाना विभागाच्या वतीने उपप्राचार्य आनंद हुली यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.या व्याख्यानांचे थेट प्रसारण संगमेश्वर कॉलेजच्या SES.Sangameshwar College या यूट्यूब चॅनेलवरून झाले.प्रा. ज्योती काडादी( विभागप्रमुख संगणकशास्त्र व व्यवस्थापन विभाग ) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. शिवराज पाटील , प्रा.संतोष खेंडे , प्रा.संतोष पवार , संतोष फुलारी यांनी या कार्यक्रमासाठी सहकार्य केले.प्रा.विक्रांत विभुते यांनी सूत्रसंचालन केले तर रात्र महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. शरण वांगी यांनी आभार मानले




खेळ म्हटला की दुखापती ह्या आल्याच. प्रत्येक खेळात काही ना काही दुखापती होतात, काही सौम्य स्वरूपाच्या तर काही गंभीर स्वरूपाच्या दुखापती असतात. यात हात-पाय मुरगळणे, सांध्यांना दुखापती होणे, सांध्याचे स्नायू दुखावणे, स्नायू तुटणे, हात-पाय फ्रैक्चर होणे, मुक्कामार बसणे अश्या एक आणि अनेक प्रकारच्या समस्या उभ्या राहतात, आजकाल जागतीक स्तरावर, देशस्तरावर खेळणाऱ्या आतरदेश पातळीवर, आंतर जिल्हा, आंतर शहर व शाळा-महाविद्यालये, विद्यापीठे या वेगवेगळ्या स्तरावर खेळणारे अनेक खेळाडू असतात. या खेळाडूना विशेषतः देश, आंतरदेश, जागतिक स्तरावर खेळणाऱ्या खेळाडूंना विशेष असे वैद्यकीय साहाय्य मिळते, व खालील स्तरावर खेळणारे खेळाडू देखील विविध प्रकारचे आधुनिक उपचार घेत असतात. बऱ्याच वेळा अनेक खेळाडूना वारंवार होणाऱ्या दुखापतीमुळे आपले करीयर यश व वेळेआधी संपवावे लागते या मध्ये या खेळाडूना आधुनिक उपचारासह फिजिओथेरपीचे देखिल उपचार मिळतात तरी अनेक वेळा हे स्पर्धक वेदनांना सामोरे जातात.
परंतु आयुर्वेद हे असे शास्त्र आहे की जे या उपचार पध्दतीसह जोडले गेल्यास खेळाडूंचे करीयर लवकर संपणार नाही बऱ्याच वेळेला आयुर्वेद म्हणजे उशिरा रिकव्हरी असे गणित मनात असते पण आयुर्वेद हा देखिल जलद उपचार देतोच याव्यतिरिक्त पुन्हा त्रास होवू नये यासाठी त्या अवयवांना बळ देण्याचे देखील कार्य करतो.

# योगिक मुद्रेद्वारे आपलं शरीर सुदृढ बनते
# संगमेश्वरमध्ये धनंजय सूर्यवंशी यांचे वेबिनार




**सोलापूर (दिनांक ३० )** '' योगिक मुद्रेच्या द्वारे आपण आपले आरोग्य सुदृढ , उत्तम राखू शकतो. कोरोनाच्या काळात आपल्या श्वसनसंस्थेवर परिणाम करणाऱ्या विषाणूपासून बचाव करायचा झाल्यास प्रतिकार शक्ती वाढवावी लागेल. रोग मुक्ती योग शक्तीनेच होते त्यासाठी योग मुद्रा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. दररोज किमान 45 मिनिटे आहे याचा सहज म्हणून आपण केलेला वापर निश्चितपणे आपल्या प्रतिकारशक्तीमध्ये वाढ करण्यासाठी मदत करेल '' असे प्रतिपादन विवेकानंद केंद्राचे योग अभ्यासक धनंजय सूर्यवंशी यांनी केले. ते संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) जिमखाना विभाग आयोजित , योगिक मुद्रा आणि त्यांचे महत्व या विषयावरील योग प्रात्यक्षिकाच्या व्याख्यानामध्ये बोलत होते. अध्यक्षस्थानी कॉलेजच्या प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य होत्या.

प्रारंभी जिमखाना विभागाच्या ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून खेळाचे महत्व अधोरेखित केले.त्यानंर कार्यक्रमास प्रारंभ झाला. यामध्येच भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार कोरोना काळातील दक्षता घेण्यासाठी आवश्यक त्या नियमांची कास आपण धरली पाहिजे. या आवाहनास प्रतिसाद देत घोषवाक्यांच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात आले. त्यानंतर संस्थेच्यावतीने त्यांचे स्वागत झाले.जिमखाना विभाग प्रमुख प्राध्यापक आनंद चव्हाण यांनी दूरदृष्टी प्रणालीद्वारे उपस्थित मान्यवरांचे स्वागत करत वक्त्यांचा परिचय करून दिला.

पुढे बोलताना सूर्यवंशी पुढे म्हणाले की , '' वेगवेगळ्या रक्तवाहिन्यांच्या माध्यमातून आपल्या शरीरातील रक्ताभिसरण प्रक्रियेला उत्तेजित करून सुप्त पेशींना जागृत करण्याचे काम योग मुद्रा च्या माध्यमातून घडते. त्याचा दैनंदिन वापर अगदी लहानांपासून वृद्धांपर्यंत केला तर आपण निरोगी जीवनशैली आत्मसात करू शकतो. गरज आहे फक्त सकारात्मक विचारांची. ''आपल्या 45 मिनिटांच्या सादरीकरणात प्रात्यक्षिकासह सूर्यवंशी यांनी उपस्थितांना योग्य विद्या , प्राणायाम आणि योग्य मुद्रा यांचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून महत्व सांगत मार्गदर्शन केलं. तंत्र सहाय्य प्रा. संतोष पवार यांनी केलं तर प्रा. शिवराज पाटील , शारीरिक शिक्षण संचालक

शरण वांगी,संतोष खेंडे यांनी वेबिनार यशस्वीतेसाठी सहकार्य केले.प्रा. विक्रांत विभुते यांनी सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले. SES. Sangameshwar College चॅनेलवरून हा कार्यक्रम थेट प्रसारित झाला






# जागतिक जलसंधारण दिनानिमित्त, भूगोल विभागाच्या वतीने दूरदृष्टी प्रणालीद्वारे व्याख्यान संपन्न झाले.

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे
संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त),सोलापूर
जागतिक जलसंधारण दिनानिमित्त, भूगोल विभागाच्या वतीने
दूरदृष्टी प्रणालीद्वारे व्याख्यान संपन्न झाले.
वक्ते होते मा. डॉ. प्रदीप पुरंदरे ( प्रसिद्ध जलतज्ञ )
विषय : महाराष्ट्रातील जलक्षेत्र - सहा दशकांचा आढावा.
शुक्रवार दि. 9 एप्रिल 2021 रोजी संध्याकाळी 5 वाजता
प्राचार्य शोभा राजमान्य यांच्या अध्यक्षतेखाली आणि
प्रा. डॉ. राजकुमार मोहरकर (भूगोल विभागप्रमुख) प्रमुख उपस्थितीत
या कार्यक्रमाचे थेट प्रसारण संगमेश्वर कॉलेजच्या
SES.Sangameshwar College
या यूट्यूब चॅनेलवर झाले.







**कार्यक्रमाची लिंक https://youtu.be/zzkUaMBc008**

# युवकांना कृषी पर्यटनात विविधांगी संधी मार्टच्या संचालिका सोनाली जाधव - मस्के

## आंतरराष्ट्रीय कृषी पर्यटन दिनानिमित्त संवाद

**सोलापूर ( प्रतिनिधी )** " युवकांनी कृषी पर्यटनातील विविधांगी संधीचा लाभ घ्यावा. शेतीपूरक व्यवसाय सोबत आता महानगरांच्या विस्ताराबरोबर कृषीपर्यटन हा चांगला व्यवसाय चांगला जोर धरतोय, गरज आहे फक्त उत्तम व्यवस्थापनाची. एकत्र कुटुंबातील व्यक्ती, बैलबारदाना, यांत्रिक शेती करणाऱ्या तरुणाईला हे क्षेत्र खुणावत आहे." असे प्रतिपादन वानप्रस्थच्या तथा जाधव गार्डन, मार्टच्या संचालिका सोनाली जाधव मस्के यांनी केले. त्या जागतिक कृषी पर्यटनदिनानिमित्त संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) भूगोल विभाग आयोजित संवादात बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य या होत्या तर प्रा.डॉ.राजकुमार मोहरकर यांनी या कार्यक्रमाचे समन्वय केले.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की," महिलांनी पुढाकार घेऊन उत्तम व्यावसायिक कौशल्याची जोड देत कृषी पर्यटनात उतरले पाहिजे. शेती कामांची विभागणी ,आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात केले तर हा व्यवसाय उत्तम चालू शकतो. कुटुंब संवाद आणि आदरातिथ्य यात महत्त्वाचे आहे. राज्यस्तरावरील मार्ट (महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ )या संस्थेकडून ही प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन केले जाते. त्याचाही लाभ घेता येतो." आपल्या उत्तर तालुक्यातील देगाव येथे विकसित केलेल्या शेतीचा प्रवास सांगत सोनाली जाधव- मस्के यांनी कृषी पर्यटनाविषयी दिलखुलास संवाद साधला. प्रारंभी प्राध्यापक डॉ. राजकुमार मोहोरकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रा.संतोष पवार यांनी संवाद साधला, रात्र महाविद्यालयाच्या प्रा.सोनाली गिरी यांनी सूत्रसंचालन करून सर्वांचे आभार मानले.हा कार्यक्रम संगमेश्वर कॉलेजच्या यूट्यूब चैनल वरून थेट प्रसारित करण्यात आला.




**कार्यक्रमाची युट्युब लिंक – https://youtu.be/f2JHWb0rcAU**




युवकांनी कृषी पर्यटनातील विविधांगी संधीचा लाभ घ्यावा. शेतीपूरक व्यवसाय सोबत आता महानगरांच्या विस्ताराबरोबर कृषीपर्यटन हा चांगला व्यवसाय चांगला जोर धरतोय, गरज आहे फक्त उत्तम व्यवस्थापनाची. एकत्र कुटुंबातील व्यक्ती, बैलबारदाना, यांत्रिक शेती करणाऱ्या तरुणाईला हे क्षेत्र खुणावत आहे." असे प्रतिपादन वानप्रस्थच्या तथा जाधव गार्डन, मार्टच्या संचालिका सोनाली जाधव मस्के यांनी केले. त्या जागतिक कृषी पर्यटनदिनानिमित्त संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) भूगोल विभाग आयोजित संवादात बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य या होत्या तर प्रा.डॉ.राजकुमार मोहरकर यांनी या कार्यक्रमाचे समन्वय केले. प्रा.संतोष पवार यांनी संवाद साधला






# आंतरराष्ट्रीय योग दिन २०२१

प्रस्तुती – संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त ), सोलापूर
मार्गदर्शन – मा. धर्मराज काडादी
( सचिव – श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर )
प्राचार्य – डॉ.शोभा राजमान्य
उपप्राचार्य –आनंद हुली
सादरकर्ते – प्रा.आनंद चव्हाण ( जिमखाना विभागप्रमुख)
प्रा. शिवराज पाटील ( भाषा विभाग समन्वयक )
निर्मिती समन्वय – प्रा.संतोष पवार

निर्मिती
संगमेश्वर कॉलेज सोलापूर

विशेष आभार
श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समिती
संगमेश्वर कॉलेज समूह
प्राचार्य – संगमेश्वर पब्लिक स्कूल ,सोलापूर

सहभाग –प्रा.शरण वांगी ,प्रा. संतोष खेंडे ,प्रा.नागेश कोल्हे,प्रा. विक्रांत विभुते, प्रशांत बिराजदार,चंद्रकांत निंबाळकर,सहायक – बसवराज तुगावकर,दत्ता लोहार.

YouTube

या प्रात्यक्षिकाची व्हिडीओ लिंक
https://youtu.be/rX1Zh3j2Qvw

# संगमेश्वर कॉलेज, सोलापूर

SHRI S. E. SOCIETY SOLAPUR

## जिमखाना विभाग आयोजित
## २३ जून ऑलिम्पिक दिनानिमित्त संवाद

## क्रीडा व व्यक्तिमत्व विकास



**बुधवार २३ जून, २०२१ रोजी, सकाळी ११ वाजता**

**तज्ञ मार्गदर्शक- पद्मावती शिवगुंडे**
संचालिका - एव्हरेस्ट एज्युकेशन रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर, पुणे

अध्यक्ष - प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य
प्राचार्य - प्रा.एस.जे.आवटे (रात्र महाविद्यालय)
समन्वयक - प्रा. आनंद चव्हाण
जिमखाना विभागप्रमुख

YouTube SES.sangameshwar college या कॉलेजच्या You Tube चॅनेलवरून थेट प्रसारण


SES.sangameshwar college या कॉलेजच्या
You Tube चॅनेलवरून थेट प्रसारण या कार्यक्रमाचे झाले.
त्यांच्या व्हिडीओ लिंक्स -
01 https://youtu.be/cAk8xCGvZfo
02 https://youtu.be/6kNeHU9UsvA

YouTube




दिनांक १३ जुलै २०२१ सकाळी ११.00 वाजता विदयार्थ्यांमधील 'वाचन अभिरुची वृद्धिंगत' करण्यासाठी वाचनाचे धोरण & तंत्र या विषयावरील डॉ. बी.टी.संपतकुमार प्रोफेसर तुमकूर युनिव्हर्सिटी (कर्नाटक) यांचे राष्ट्रीय स्तरावरील वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.हा संपूर्ण कार्यक्रम व्हिडीओ रूपात खालील लिंक वरून विषय पहा.
https://youtu.be/y_HB3BteweI

YouTube




श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित

# कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालय

## संगमेश्वर कॉलेज आवार, सात रस्ता, सोलापूर

मूलभूत अभ्यासक्रम / फाउंडेशन कोर्स - एक वर्ष
आर्ट टीचर डिप्लोमा अर्थात ATD - दोन वर्ष
जी.डी.आर्ट पेंटिंग - चार वर्ष **या**

## चित्रकलेतील कोर्सेससाठी प्रवेश देणे सुरू आहे

विद्यार्थी मित्रांनो
चित्रकलेतील या शिक्षणानंतर
चित्रकार , टेक्सटाईल डिझायनिंग, फॅशन डिझायनिंग, कलादिग्दर्शन, इंटेरिअर डिझायनिंग,
या सोबत केंद्रीय आणि जवाहर नवोदय विद्यालयात आणि राज्यशासनाच्या माध्यमिक शाळेमध्ये चित्रकला शिक्षक म्हणून नोकरी करता येते.
आर्किटेक्चर मधील करियरसाठी जी पूर्व परीक्षा असते NATA त्या पूर्व परीक्षेची तयारी देखील या कोर्सच्या माध्यमातून होते.
भारतातील सर्वोच्च अभियांत्रिकी संस्था असलेल्या आयआयटी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेत पदव्युत्तर पदवी मिळवण्यासाठी CEED नावाची एंट्रन्स परीक्षा असते ती परीक्षा द्यावी लागते. त्याची तयारी या कोर्सच्या माध्यमातून होते अर्थातच या चित्रकलेच्या करिअरसाठी आजच संपर्क साधा.

आमच्याकडील सुविधा
* मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची सोय
* तज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग आणि भव्य इमारत
* सुसज्ज ग्रंथालय भरपूर प्रात्यक्षिके आणि संगणकाची सोया
- सात रस्ता सारख्या मध्यवर्ती ठिकाणी कॉलेज असल्याकारणानं आजच संपर्क साधा

**प्रवेश आणि अधिक माहितीसाठी संपर्क साधा - 99 75 432 141**

# संगमेश्वरचे उपप्राचार्य आनंद हुली सेवानिवृत्त

सोलापूर (प्रतिनिधी)

संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) येथील कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य आपल्या 36 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा. धर्मराज काडादी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, उपप्राचार्य श्रीनिवास गोठे, डी.एम. मैत्री, पर्यवेक्षक प्रसाद कुंटे, विज्ञान विभाग प्रमुख प्रमोद उडगीकर, भाषा समन्वयक शिवराज पाटील, डॉ. दिपाली करजगीकर, कला शाखा प्रमुख शिवशरण दुलंगे, राहुल कराडे प्राचार्य संतोष पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



**आपल्या 36 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर उपप्राचार्य आनंद हुली सेवानिवृत्त झाले. संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा. धर्मराज काडादी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.**

आपल्या प्रास्ताविकात प्रमोद उडगीकर यांनी हुली सर यांच्या काळातील संस्थात्मक कार्याचा आढावा घेतला. त्यानंतर संस्थेच्या वतीने गौरव झाला.वरिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने उपप्राचार्य श्रीनिवास गोठे, डी. एम. मेत्री यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्या म्हणाल्या की," प्रशासकीय पातळीवरील केलेल्या काम ,त्यातील सातत्य,समन्वय महत्वाचे असते. समर्पण भावनेने सरांनी सुरु केलेले उपक्रम गुणवत्ता विकसित करण्यास मदत करणारे आहेत." कार्यालयीन कामकाज आणि संस्थेच्या बहुविध भौतिक विकासातील योगदानाबाबत डॉ.दिपाली करजगीकर यांनी हुली सर यांच्या कार्याचे कौतुक केले.

याप्रसंगी बोलताना धर्मराज काडादी म्हणाले," संगमेश्वर कॉलेजच्या स्थापने पासूनच्या परंपरेला साजेसे काम सरांनी केले, त्यांच्या कामातील व्यस्ततेतही शैक्षणिक प्रगतीचा आलेख कायम वरती ठेवला आणि त्यांची उत्साही,सकारात्मक कार्यपद्धती नेहमी लक्षात राहील. त्यांच्या निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी शुभेच्छा."कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक प्रमोद उडगीकर यांनी केले तर आभार भाषा समन्वयक शिवराज पाटील यांनी मानले.

# संगमेश्वरचा बारावी निकाल शंभर टक्के

## विज्ञान शाखा

प्रथम - तापडिया आचल दिपक ९८ गायकवाड भाग्यश्री उमेश ९८

द्वितीय - गांधी ईशिका अभय ९७. ८३ तृतीय - हिरापुरे शिरीष हणमंत ९७.६७










वाणिज्य शाखा प्रथम -हुल्ले लक्ष्मी चंद्रकांत ९७.३३ द्वितीय - स्वामी सृष्टी संजीव ९६.५० तृतीय - राऊत आरती संतोष ९६.९७





**कला शाखा** - प्रथम - वरशेट्टी विराज राजशेखर ९८.८३
.द्वितीय - धप्पाधुळे वैष्णवी संजय ९७.३
तृतीय - कोंडेवार तपस्या निलेश ९७.००

## सर्व यशस्वीतांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन !!!

**गुणवंतांच्या सत्काराच्या कार्यक्रमाचे प्रसारण SES.sangameshwar college या कॉलेजच्या You Tube चॅनेलवरून झाले.**

https://youtu.be/_w3vhtKZRQU

# संगमेश्वरचा बारावी निकाल शंभर टक्के

सोलापूर दिनांक ( ३ ऑगस्ट )
येथील संगमेश्वर ज्युनिअर कॉलेज ,सोलापूरचा इयत्ता बारावीचा कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के इतका लागला. कोविड १९ मुळे बारावीची परीक्षा यंदा घेता आली नाही. अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे निकाल तयार करण्यात आलाय. दुपारी चार वाजता ऑनलाईन निकाल उपल झाला. कला शाखा - प्रथम - वरशेट्टी विराज राजशेखर ९८.८३ कला शाखेचा वरशेट्टी सॉफ्टबॉल आणि बेसबॉल मध्ये राष्ट्रीय खेळाडू आहे.द्वितीय - धप्पाधुळे वैष्णवी संजय ९७.३तृतीय - कोंडेवार तपस्या निलेश ९७.००
वाणिज्य शाखा प्रथम -हुल्ले लक्ष्मी चंद्रकांत ९७.३३ द्वितीय - स्वामी सृष्टी संजीव ९६.५० ,तृतीय - राऊत आरती संतोष ९६.१७
विज्ञान शाखा प्रथम - तापडिया आचल दिपक ९८ , गायकवाड भाग्यश्री उमेश ९८ द्वितीय - गांधी ईशिका अभय ९७.३
तृतीय - हिरापुरे शिरीष हणमंत ९७.६७

या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा. धर्मराज काडादी ,संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी , प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य ,पर्यवेक्षक प्रसाद कुंटे, भाषा समन्वय प्रा. शिवराज पाटील , वाणिज्य समन्वयक प्रा. बसय्या हणमगाव , कला शाखा समन्वयक प्रा.शिवशरण दुलंगे यांच्यासह सर्व विभागातील प्राध्यापकवृंद , कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.

www.mahresult.nic.in व https://msbshse.co.in या संकेतस्थळांवर विद्यार्थ्यांना निकालाशिवाय निकालाबाबततची अन्य सांख्यिकीय माहिती उपल आहे.
विद्यार्थ्यांना परीक्षेआधी मिळालेल्या सीट नंबरनुसार निकाल पाहता येणार आहे. गेले अनेक दिवस राज्यातील लाखो विद्यार्थी आणि त्यांचे पालक या निकालाची आतुरतेने वाट पाहत होते. विद्यार्थ्यांचे पुढील पदवी प्रवेश किंवा व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश या निकालावर अवलंबून असल्याने या निकालाकडे त्यांचे लक्ष लागून राहिले होते.



वाणिज्य शाखा प्रथम -हुल्ले लक्ष्मी चंद्रकांत ९७.३३ द्वितीय - स्वामी सृष्टी संजीव ९६.५०



प्रथम - तापडिया आचल दिपक ९८ गायकवाड भाग्यश्री उमेश ९८



कला शाखा - प्रथम - वरशेट्टी विराज राजशेखर ९८.८३
.द्वितीय - धप्पाधुळे वैष्णवी संजय ९७.३
तृतीय - कोंडेवार तपस्या निलेश ९७.००

# देशसेवेची पोलीस खात्यात उत्तम संधी

## 'संगमेश्वर'मध्ये पाटील यांनी साधला विद्यार्थ्यांशी सुसंवाद


शहर संचार

सोलापूर, दि. १८- महाविद्यालयीन जीवनात योग्य दिशा सापडली की आपण पोलीस दलातील करिअर नक्की निवडा. देशसेवेसाठी पोलिसातील करिअर महत्त्वाचे आहे. या क्षेत्रातील सेवा ही उत्तम देशसेवेची संधी आहे. तरुणांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर पाटील यांनी केले.

संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग कला शाखा आयोजित 'पोलिसातील करिअर' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानात पाटील बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, कला शाखा समन्वयक शिवशरण दुलंगे आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या संगमेश्वर गीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. त्यानंतर सरस्वती पूजन झाले. समन्वयक दुलंगे यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख मार्गदर्शकांचा कॉलेजच्यावतीने सत्कार झाला. विद्यार्थ्यांनी बलोपासना केली पाहिजे. आहार-विहार यावरील संयमातून करिअरशी निगडित आपले व्यक्तिमत्त्व घडते. तरुण वयात चालू घडामोडींवर तसेच गुन्हेगारीकडे आपले लक्ष असले पाहिजे. कारण त्यापासून आपल्याला लांब राहायचे आहे. मजा म्हणून कायदा तोडण्याचा प्रयत्न करू नका, त्यातून मिळणारी सजा ही खूप मोठी असते. तुमचे करिअर खराब होऊ शकते, असा मौलिक सल्लाही पाटील यांनी दिला.



अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य कुंटे यांनी विद्यार्थ्यांना पोलीस क्षेत्रातील करिअरविषयी पाटील यांनी सांगितलेल्या गोष्टींचा नक्की फायदा होईल, असे सांगत कला शाखा व्याख्यानमाला का आयोजित करत आहोत याबद्दल हेतू स्पष्ट केला. याप्रसंगी हर्षवर्धन पाटील, रंगसिद्ध पाटील, संतोष पवार, शिवराज देसाई, शंकर कोमुलवार, डॉ. प्रकाश कतनळ्ळी, डॉ. विठ्ठल अरबाळे, शहाजी माने, कोमल कोंडा आदी कला शाखेतील प्राध्यापक उपस्थित होते. रश्मी कन्नूरकर यांनी या सूत्रसंचालन केले तर विश्वनाथ कक्कळमेली यांनी आभार मानले.






# संगमेश्वर कॉलेजचा बारावी निकाल शंभर टक्के

संचार प्रतिनिधी

सोलापूर, दि. ३- येथील संगमेश्वर ज्युनिअर कॉलेजचा इयत्ता बारावीचा कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

यंदा अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे निकाल जाहीर करण्यात आला आहे.

**कला शाखा** : प्रथम- वरशेट्टी राजशेखर (९८.८३ टक्के), द्वितीय -धप्पाधुळे वैष्णवी (९७.३), तृतीय- कोंडेवार तपस्या (९७).

**वाणिज्य शाखा** : प्रथम- हुल्ले लक्ष्मी (९७.३३), द्वितीय- स्वामी सृष्टी (९६.५०), तृतीय- आरती राऊत (९६.१७).

**विज्ञान शाखा** : प्रथम- आचल तापडिया (९८), भाग्यश्री गायकवाड (९८), द्वितीय- ईशिका गांधी (९७.३), तृतीय- शिरीष हिरापुरे (९७.६७).



आचल तापडिया, भाग्यश्री गायकवाड, ईशिका गांधी, शिरीष हिरापुरे, लक्ष्मी हुल्ले, सृष्टी स्वामी, आरती राऊत, राजशेखर वरशेट्टी, वैष्णवी धप्पाधुळे, तपस्या कोंडेवार

संस्थेच्यावतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी, प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, पर्यवेक्षक प्रसाद कुंटे, भाषा समन्वय प्रा. शिवराज पाटील, वाणिज्य समन्वयक प्रा. बसय्या हणमगाव, कला शाखा समन्वयक प्रा. शिवशरण दुलंगे आदींनी अभिनंदन केले.

www.mahresult.nic.in d https://msbshse.co.in या संकेतस्थळांवर विद्यार्थ्यांना निकालाशिवाय निकालाबाबततची अन्य सांख्यिकीय माहिती उपलब्ध आहे.

विद्यार्थ्यांना परीक्षेआधी मिळालेल्या सीट नंबरनुसार निकाल पाहता येणार आहे. गेले अनेक दिवस राज्यातील लाखो विद्यार्थी आणि त्यांचे पालक या निकालाची आतुरतेने वाट पाहात होते. विद्यार्थ्यांचे पुढील पदवी प्रवेश किंवा व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश या निकालावर अवलंबून असल्याने या निकालाकडे त्यांचे लक्ष लागून राहिले होते.

Online संचार



मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन ...




## अमृतमहोत्सवी भारतीय स्वातंत्र्यदिन संगमेश्वरमध्ये उत्साहात

सोलापूर (दिनांक १५ ) अमृतमहोत्सवी अर्थात ७५ वा भारतीय स्वातंत्र्यदिन संगमेश्वर कॉलेज स्वायत्त इथं मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संगमेश्वरच्या प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी चे कर्नल प्रशांत नायर उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य एस जे आवटे, प्राचार्य गायत्री कुलकर्णी, प्राचार्य दीपक पाटील यांच्यासह एनसीसी विभागाचे अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी एनसीसीच्या वतीने प्रमुख पाहुण्यांना निमंत्रित करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहण झालं. याच कार्यक्रमात केंद्र शासनाच्या वतीने कर्नल प्रशांत नायर यांना भारतीय सेनेच्या वतीने सेना पदक व विशिष्ट सेना पदक मिळाल्याबद्दल त्यांचा कॉलेजच्या वतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्यांनी अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या तर प्रमुख पाहुणे कर्नल प्रशांत नायर यांनी अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन आपण सारे जण मोठ्या उत्साहात साजरा करत आहोत त्याचा एनसीसी विभाग हा राष्ट्राचा अविभाज्य घटक असल्याचेही त्यांनी प्रतिपादित केले. याप्रसंगी संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) , कनिष्ठ विभाग,संगमेश्वर पब्लिक स्कूल मधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी ,एनसीसी विभागाचे अधिकारी ,कर्मचारी, कॅडेट्स आदी मान्यवर उपस्थित होते.मेजर चंद्रकांत हिरतोट यांनी ध्वजारोहण कार्यक्रमाचे संचलन करून आभार मानले.

**अमृतमहोत्सवी अर्थात 75 वा भारतीय स्वातंत्र्यदिन संगमेश्वर कॉलेज स्वायत्त इथं मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाची बातमी व्हिडीओ रूपात खालील लिंक वरून विषय पहा.**

https://youtu.be/Mw-9K1WK4Eo

YouTube




कर्मयोगी अप्पासाहेबांच्या
स्मृतिस विनम्र अभिवादन...

- संगमेश्वर कॉलेज परिवार

# संगमेश्वर कॉलेज, दैनिक संचार आणि कर्मयोगी अप्पासाहेब काडादी नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित






## कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी जयंती प्रित्यर्थ ...

आंतरमहाविद्यालयीन ऑनलाइन

# उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा 2021

**पारितोषिके**

प्रथम क्रमांक -१५०० रुपये
द्वितीय क्रमांक -१००१ रुपये
तृतीय क्रमांक - ७०१ रुपये
चौथा क्रमांक-५०१ रुपये
पाचवा क्रमांक-४०१ रुपये
सहावा क्रमांक -३०१ रुपये
उत्तेजनार्थ दोन प्रशस्तिपत्रके

दिनांक - 11 सप्टेंबर 2021 पर्यंत अंतिम नाव नोंदणीसाठीची गुगल फॉर्मची लिंक आहे..
संयोजक - कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा
द्वारा : प्राचार्य, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर.
तारीख व वेळ - सोमवार दिनांक 13 सप्टेंबर 2021 रोजी सकाळी 11 वाजता. संपर्क - 9960272031 / 8275458160 /9822 984 313



**कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त आयोजित**

## राज्यस्तरीय ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेचे विजेते

# हार्दिक अभिनंदन !!!



प्रथम क्रमांक - वृषभ चौधरी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)



द्वितीय क्रमांक- मिथुन दत्तात्रय माने
(डी. पी.भोसले कॉलेज सातारा )



तृतीय क्रमांक- संतोष सर्जेराव शिंदे
(की-स्टोन इंजिनिअरिंग कॉलेज, पुणे)



चतुर्थ क्रमांक - अक्षय मारुती इळके
(नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्स , इचलकरंजी)



पाचवा क्रमांक- प्रसाद देविदास जगताप
(विद्यावर्धिनी सभेचे कला व वाणिज्य महाविद्यालय)



सहावा क्रमांक - श्रेया प्रभाकर माशाळ
(संगमेश्वर कॉलेज, सोलापूर)

२ सोलापूर, बुधवार, १५ सप्टेंबर २०२१ संचार

## कर्मयोगी अप्पासाहेब काडादी जयंती

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत चौधरी प्रथम

संचार प्रतिनिधी



सोलापूर, दि. १४- कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त दै. 'संचार' प्रबोधन मंच आणि कर्मयोगी अप्पासाहेब नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाइन राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वृषभ चौधरी याने प्रथम क्रमांक पटकाविला.

मंगळवारी झालेल्या या वक्तृत्व स्पर्धेत राज्यभरातील विविध महाविद्यालयांतील स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. महाविद्यालयीन स्पर्धकांनी पाणी, गांधी विचार, ऑनलाइन शिक्षण, विवेक, अध्यात्म, धर्म, अर्थव्यवस्था, स्मार्ट सिटी, शिल्प, चित्र, ग्रंथालय, पुस्तके यासह समाजातील सर्वच स्तरावरील विषय उत्स्फूर्तपणे मांडले.

**निकाल व पारितोषिक याप्रमाणे :**

प्रथम १५०० रुपये : वृषभ चौधरी (सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ), द्वितीय १००१ रुपये : मिथून माने (बी. पी. भोसले कॉलेज, सातारा), तृतीय ७०१ रुपये : संतोष शिंदे (की-स्टोन इंजिनिअरिंग कॉलेज, पुणे), चतुर्थ ५०१ रुपये : अक्षय इळके (नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, इचलकरंजी), पाचवा ४०१ रुपये : प्रसाद जगताप (विद्यावर्धिनी सभेचे कला व वाणिज्य महाविद्यालय), सहावा ३०१ रुपये : श्रेया माशाळ (संगमेश्वर कॉलेज, सोलापूर), उत्तेजनार्थ : सौरभ वाघमारे (दयानंद


वृषभ चौधरी


मिथून माने


संतोष शिंदे


अक्षय इळके


प्रसाद जगताप


श्रेया माशाळ

महाविद्यालय, सोलापूर), अनिकेत ढमाळे (न्यू आर्ट्स कॉलेज, अहमदनगर). उत्तेजनार्थ दोघांना प्रशस्तिपत्रके जाहीर झाली आहेत.

उद्घाटन सत्रात कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांना अभिवादन करून यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले. मराठी विभागप्रमुख डॉ. सुहास पुजारी यांनी या सत्राचे प्रास्ताविक केले. उपस्थित परीक्षक प्रा. राजकुमार नवले आणि प्रा. सागर सुरवसे यांचा कॉलेजच्यावतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, कर्मयोगी अप्पासाहेब नागरी सहकारी पतसंस्थेचे प्रा. बी. एन. पटणे, उपप्राचार्य डी. एम. मेत्री आदी यावेळी उपस्थित होते.

उद्घाटन सत्रात सूत्रसंचालन करून सूचना आणि तांत्रिक बाबी प्रा. संतोष पवार यांनी स्पष्ट केल्या. या स्पर्धेचे थेट प्रसारण संगमेश्वर कॉलेज स्वायत्तच्या यूट्यूब वाहिनीवरून थेट प्रसारित झाले. स्पर्धा यशस्वितेसाठी प्रा. डॉ. दादासाहेब खांडेकर, प्रा. राजकुमार खिलारे, प्रा. शीला रामपुरे, प्रा. सुहास दहिटणेकर, डॉ. मंजू संगेपाग, प्रा. शिवराज पाटील, प्रा. एस. बी. निंबगी, प्रा. दत्तात्रय गुड्डेवाडी आदींनी सहकार्य केले. तंत्र सहायक म्हणून संतोष फुलारी यांनी सहाय केले.

**कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेतील भाषणे अवश्य पहा... कॉलेजच्या यूट्यूब चॅनेलवरून ही संपूर्ण स्पर्धा पाहण्यासाठी खालील लिंकवर अवश्य जा...**
**आणि आमचं चॅनेल सबस्क्राईब करा. https://youtu.be/AbzPOJ-6Ip4**

YouTube

# जेईई – मेन्स 2021 परीक्षेमध्ये संगमेश्वरच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

सोलापूर प्रतिनिधी ( दिनांक १६ ) नॅशनल टेस्टिंग एजन्सी नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या जेईई मेन्स 2021 या परीक्षेमध्ये घेण्यात आलेल्या चारही परीक्षेत संगमेश्वर ज्युनिअर कॉलेजच्या सत्तावीस (27) विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे आणि हे सर्व विद्यार्थी जे ई ई ॲडव्हान्स परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.गुणवंत विद्यार्थी आणि गुण :

रिया कस्तुरे 97.89
आदिती कुलकर्णी 97.43
ऐश्वर्या घाटोळे 97.29
अभिजीत ख्याडे 96.41
मिताली पाटील 96.25
श्रेयस शिंदे 95.00
चिन्मय धमगुंडे 94.60
रितेश कोडम 94.23
श्रेयस मसलेकर 93.05
तमन्ना समदुर 93.00
राहुल जगताप 92.47
मानस राठी 91.70
पार्थ गुरव 91.21
प्रभाकर उपळाईकर 90.90
प्रणोती खोबण 89.10
जानवी कुलकर्णी 88.94
ऐश्वर्या गोळेकर 88.18
गौरव कुलकर्णी 88.04
हरीश मंता 85.20 पाटील
सुयश नेवारे 84.78
निवेदिता धनांली 84.10
आंचल तापडिया 81.75
समर्थ मुळे 80.27
तनिष्का लिमकर 74.29
प्रसाद पाटील 73.34
यश पंडित 69.81



कस्तुरे रिया अमोल



कुलकर्णी आदिती अभिजीत



घाटोळे ऐश्वर्या नितीन



मिताली महांतेश्वर



कोडम रितेश श्रीनिवास



धमगुंडे चिन्मय शिवयोगी

## JEE Main Result

गुणवंत विद्यार्थ्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री. धर्मराज काडादी, व्यवस्थापन समिती सदस्य श्री. पुष्पराज काडादी, प्राचार्या सौ. शोभा राजमान्य, उपप्राचार्य श्री. प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक श्री मल्लिनाथ साखरे, विज्ञान शाखा समन्वयक श्री. रामराव राठोड एसआयपी सेल समन्वयक डॉ. गणेश मुडेगावकर, प्रा. शिवराज बगले, प्रा. सुशांत माळवे, प्रा. अविनाश घोडके, डॉ.अनिल देवकर यांनी अभिनंदन केले आहे

# संगमेश्वरमध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरी परिष्करण दिन व ग्रंथप्रदर्शन

# महाविद्यालयीन जीवनात पुस्तकांनी मला समृद्ध केले

-- आनंद बनसोडे

# कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी जयंतीचा उपक्रम




सोलापूर प्रतिनिधी (दिनांक २७ ) ''माझ्या शालेय आणि महाविद्यालयीन जीवनातल्या भेटलेल्या माणसांसोबत पुस्तकांनी मला समृद्ध केले. पुस्तकांच्या दुनियेत रमल्याने जगातील सामाजिक स्थित्यंतरे कळाली, म्हणून माझा जीवनप्रवास आनंदाने सुरू आहे" असे प्रतिपादन एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांनी केले. ते कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) इथं ग्रंथालय विभागातील 'ग्रंथप्रदर्शन' प्रसंगी बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, ग्रंथालय समन्वयक प्रा. डॉ. सुहास पुजारी, ग्रंथपाल डॉ. विजय मुलीमनी ,संतोष कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

सुरुवातीला ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या ७२५ व्या परिष्करण दिनानिमित्त 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाचे व सरस्वती पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर प्रास्ताविक झाले. प्रास्ताविका नंतर कॉलेजच्यावतीने मान्यवरांचा सत्कार झाला. उपस्थित मान्यवरांच्या सोबत आनंद बनसोडे यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन झाले. याच कार्यक्रमात ग्रंथ परीक्षण स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला, यामध्ये अनुक्रमे मोहम्मद करीम हाजी मस्तान शेख (संगमेश्वर कॉलेज ),भूपती प्रभू जगधने ( दयानंद विधी महाविद्यालय ), धनश्री दिनेश शिंदे (संगमेश्वर कॉलेज) यांचा सन्मान झाला. कोल्हापूरच्या मेहता पब्लिकेशनच्या वाहिद म्याकल यांचाही सत्कार झाला.

त्यानंतर ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या ७२५ व्या परिष्करण दिनानिमित्त मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुहास पुजारी यांनी संत ज्ञानेश्वर यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेत ज्ञानेश्वरीने मानवी जीवनामध्ये केलेली क्रांती यावर भाष्य करत उपस्थितांना मंत्रमु केले. डॉ.शोभा राजमान्य यांनी अध्यक्षीय भाषणात ग्रंथांचे आपल्या जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी प्रा. डॉ.संघप्रकाश दुडडे, प्रा.सिद्धाराम विजापुरे,प्रा. डॉ. शिवाजी मस्के, प्रा. डॉ.महादेव देशमुख ,प्रा. डॉ. रामचंद्र संगशेट्टी, प्रा. सिद्धाराम विजापुरे , प्रा. संतोष पवार, गणेश फंड यांच्यासह ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.






# दहावी नंतर कॉमर्स क्षेत्रातील

(CA) चार्टर्ड अकाउंटंट,
(CS)कंपनी सेक्रेटरी आणि
(CMA ) कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंट
मधील करिअर साठी
अवश्य संपर्क साधा
संगमेश्वर कॉलेज सात रस्ता, सोलापूर
आमची वेबसाईट
www.sangameshwarcollege.in
मोबाईल : 94 200 89 535

YouTube



# मराठी विश्वकोश

# मराठी विश्वकोशातील समृद्ध माहिती

मराठी भाषेची माहिती विश्वकोश यावरील संकलित केलेली माहिती ही ज्ञानात भर टाकणारी आहे. या निमित्तानं विश्वकोशातील चित्रकलेविषयी ची संभाजी कदम यांची संकलित माहिती खास आपल्यासाठी आम्ही देत आहोत मराठी विश्वकोश मंडळाच्या सौजन्याने. यावरून अस्सल माहिती आपण जाणून घ्यावी. समृद्धीसाठी अवश्य मराठी विश्वकोशाच्या https://vishwakosh.marathi.gov.in/22117 / या संकेतस्थळाचा वापर करावा

**चित्रकला :** रंगविलेल्या आकारांतून साधलेली कलाकृती म्हणजे चित्र, अशी चित्राची सर्वसामान्य व्याख्या करता येते. रंगविण्याच्या प्रक्रियेतच चित्र घडले जाते. लेखन आणि रंगलेपन या दोन्ही क्रिया यात अंगभूत असतात. इंग्रजीतील 'पेंटींग' या शब्दाचा अर्थ 'रंगविण्याच्या क्रिये'पुरताच मर्यादित आहे पण चित्रकलेच्या क्षेत्रात लेपनाची क्रिया, रंग-कुंचला-फलकादी माध्यम साधनांची गुणवत्ता, कलावंताच्या भावजाणिवांचे चित्राकृतीतील प्रतिबिंब इ. सर्व सर्जनप्रक्रियांचा अंतर्भाव 'पेंटींग' या संज्ञेमध्ये होतो. मराठीतील 'चित्रकला' ही संज्ञा याच अर्थाने वापरली जाते. 'रंगविण्याची' व्यावहारिक उद्दिष्टे अनेक असतात. घर, नित्योपयोगी वस्तू, कापड, यंत्रसामग्री इत्यादींच्या सुशोभनासाठी वा मंडनासाठी केलेले रंगकाम कारागिरी वा कनिष्ठ किंवा उपयोजित कला यांच्या प्रांतात मोडते. मानवी भावजाणिवांच्या निखळ आविष्कारासाठी अवतरणारे रंगलेपनाचे प्रकार चित्रकलेत मोडतात.

शिलाखंडावर रेघोट्या ओढणाऱ्या अश्मयुगीन मानवाने आपातत: चित्रकलेचा पाया घातला. फ्रँकोकँटेब्रिअन संस्कृतीतील आदिमानवाने निर्मिलेली ⇨अल्तामिरा येथील भित्तिचित्रे अनन्यसाधारण आहेत. आदिमानवाची कला म्हणजे त्याच्या यातुविद्येमधील एक विधी होता आणि यातुविद्या म्हणजे प्रतिकूलतेतही बेहोषीने जीवनकलहास तोंड देण्याची अध्यात्मविद्या होती. मानवी बुद्धिशक्तींना दुर्गम अशा शक्तिसिद्धी यातुविद्येतून मिळत असल्याने 'अशक्य ते शक्य' करणाऱ्या या चित्रकिमयेबद्दल मानवाला आदिम काळापासून विस्मय वाटत आला आहे. 'चित्र' या संज्ञेच्या मूळ संस्कृत अर्थच्छटांमध्ये तो प्रतिबिंबित झालेला दिसतो. चित्र म्हणजे काहीतरी नेत्रदीपक, असामान्य, आश्चर्यकारक, आकाश वा स्वर्ग. चित्रकर्म म्हणजे असामान्य कृती अथवा यातुविद्या व चित्रकर्मा म्हणजे चमत्कार करून दाखविणारा जादूगार किंवा कलावंत, चित्रोक्ती आणि चित्रकथालाप या शब्दांचे अद्भुत कथा, सुसंवादी निरूपण असेही अर्थ मिळतात. यांतील सुसंवादित्व हीच सर्व कलेची अंगभूत प्रेरणा आहे. कला या अर्थाचा शिल्प हा प्राचीन संस्कृत शब्दसुद्धा यातुविद्येशी संलग्न होता. आजच्या काळात मात्र शिल्प ही संज्ञा मराठी दृश्यकलांमधील त्रिमितीय आविष्कारांसाठी म्हणजे इंग्रजीत 'स्कल्प्चर' या संज्ञेचा पर्याय म्हणून वापरली जाते. चित्रकला हा द्विमितीय फलकावरील दृश्यकलाप्रकार आहे. माध्यमशुद्धतेचा विचार करता, रंगलेपित शिल्पे ही चित्र किंवा शिल्प यांपैकी कोणत्याही एका माध्यमात चपखलपणे बसत नाही. माध्यमशुद्धतेचा हा आग्रह प्राचीन काळी नव्हता आणि आजच्या अत्याधुनिक काळातही तो गौण ठरला आहे. रंगलेपित शिल्पे आणि त्रिमितीय पृष्ठोद्गमाचे वा उत्थितपृष्ठाचे चिक्कणितचित्रासारखे (कोलाज) प्रकार आता रूढ झाले आहेत. या लेखात चित्रकला म्हणजे द्विमितीय माध्यमातील कलाविष्कार, असे सूत्र धरून विवेचन केले आहे.

# संगमेश्वर कॉलेजच्या चार विद्यार्थ्यांचे जेईई ॲडव्हान्स परीक्षेत यश



तमन्ना समदुर(1614)



सौरव वैरागकर (2149)



श्रेयस शिंदे (2718)



आदिती कुलकर्णी (4029)

## संगमेश्वर कॉलेज, सोलापूर

हार्दिक अभिनंदन.




**ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या ७२५ व्या परिष्करण दिनानिमित्त**

**मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुहास पुजारी**

यांनी संत ज्ञानेश्वर यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेत ज्ञानेश्वरीने मानवी जीवनामध्ये केलेली क्रांती यावर भाष्य करत उपस्थितांना मंत्रमु केले. डॉ.शोभा राजमान्य यांनी अध्यक्षीय भाषणात ग्रंथांचे आपल्या जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी प्रा. डॉ.संघप्रकाश दुडडे, प्रा.सिद्धाराम विजापुरे,प्रा. डॉ. शिवाजी मस्के, प्रा. डॉ.महादेव देशमुख ,प्रा. डॉ. रामचंद्र संगशेट्टी, प्रा. सिद्धाराम विजापुरे , प्रा. संतोष पवार, गणेश फंड यांच्यासह ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. या भाषणाची व्हिडीओ लिंक –

https://youtu.be/mfmjOj-eK0g

संचार

• सोलापूर • गुरुवार, १६ सप्टेंबर २०२१



# इच्छाशक्ती आणि कष्टातून यशप्राप्ती शक्य : सातपुते

## संगमेश्वर कॉलेजचा ६८ वा पारितोषिक वितरण समारंभ




सोलापूर : संगमेश्वर कॉलेजच्या ६८ व्या वार्षिक शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभात पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, अॅड. आर. एस. पाटील, प्राचार्या डॉ. शोभा राजमान्य, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, प्राचार्य एस. जे. आवटे, प्राचार्य दीपक पाटील, विपुल मिरजकर.

संचार प्रतिनिधी

सोलापूर, दि. १५- जीवनात यश संपादन करण्यासाठी इच्छाशक्ती आणि कष्ट या दोन गोष्टींना अतिशय महत्त्वाचे स्थान असून त्यांच्या माध्यमातूनच यशप्राप्ती शक्य होते, असे मत पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी व्यक्त केले.

बुधवारी, संगमेश्वर कॉलेजच्या ६८ व्या वार्षिक शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून सातपुते बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, अॅड. आर. एस. पाटील, संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जे. आवटे, कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य दीपक पाटील उपस्थित होते.

सातपुते पुढे म्हणाल्या, गेल्या दोन वर्षात कोरोनाने सर्वच क्षेत्रात मोठे बदल घडविले आहेत. विशेषत: शिक्षणात ऑनलाइन माध्यमातून नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. ही शिक्षण प्रणाली मर्यादित काळासाठी असली तरी त्यातून विद्यार्थी, शिक्षक यांना नवी तंत्रज्ञाने अवगत झालेली आहेत. ऑनलाइन शिक्षणाची व्यवस्था खेड्यापाड्यापर्यंत पोहोचलेली आहे. मात्र, अजून बरेच विद्यार्थी साधनांच्या अभावी शिक्षणापासून दूर गेलेले आहेत. यासाठी ज्यांच्याकडे ही साधने उपलब्ध आहेत, त्यांनी सर्वांना एकत्र घेऊन नव्या शैक्षणिक संधीचा फायदा करून घ्यावा आणि एक जबाबदार नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडावे.

प्रत्येक व्यक्तीमध्ये गुण व दोष असतात. मात्र, शिक्षण घेताना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुणांना विकसित करून त्यांना गुणवंत करण्याचे कार्य शिक्षक करतात. त्यामुळे शिक्षकाला जीवनामध्ये मार्गदर्शक म्हटले जाते. आजच्या ऑनलाइन शिक्षण व्यवस्थेत कॉलेज बंद असून विद्यार्थी व शिक्षक दुरावला आहे. असे असले तरी ऑनलाइन अध्यापनाच्या माध्यमातून शिक्षक सध्या ज्ञानदान करत आहेत, असेही त्या म्हणाल्या.

सोलापूरकर हे कलाप्रेमी आहेत. संगीत, नाट्य, क्रीडा, चित्रकला आदी क्षेत्रात सोलापूरचा नावलौकिक असून त्यामध्ये संगमेश्वर कॉलेजचे योगदान मोठे असल्याचे गौरवोद्गार सातपुते यांनी याप्रसंगी काढले.

कार्यक्रमाची सुरुवात रसिका कुलकर्णी व सानिका कुलकर्णी यांच्या ईशस्तवनाने झाली. कॉलेजच्या वार्षिक अहवालाचे वाचन प्राचार्या डॉ. शोभा राजमान्य यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. लीना खमितकर यांनी करून दिला. उपप्राचार्य प्रसाद कुंटे व डॉ. विजयकुमार मुलीमनी यांनी गुणवत्ता यादीचे वाचन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. आभार विद्यार्थी प्रतिनिधी विपुल मिरजकर याने मानले. सूत्रसंचालन डॉ. आरती दिवटे व प्रा. संतोष पवार यांनी केले. याप्रसंगी निवडक विद्यार्थी, पालक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

68 व्या वार्षिक शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभात पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा संपूर्ण व्हिडिओ खालील लिंक वरून देत आहोत...
https://youtu.be/bLBy8n8iS3U


Shri Sangameshwar Education Society, Solapur
SHRI S. E. SOCIETY SOLAPUR
SANGAMESHWAR COLLEGE
SOLAPUR (AUTONOMOUS)
Kannada Linguistic Minority Institute
(Affiliated with Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University)
NAAC Accredited with 'A' Grade (III Cycle CGPA 3.39)
PROMISING CAREER AFTER H.S.C. COMMERCE
B.COM
MARKETING
ADMISSION - 2021-22
Eligibility : 12th Commerce
Available Facilities
Tradition of Excellence ■ Qualified & Dedicated Staff
Smart Classrooms for interactive & participative learning
Capacity Enhancements through Guest Lectures, Seminars, Workshops
Industrial Visits/Internships ■ Serene & Amenable atmosphere
Wi-fi enabled campus ■ Culture of Empowerment ■ Rich Library
Best Campus Placement Record - 100 plus students placed every year
Skill Enhancement Courses ■ Hostel facilities with Mess
Career After B.COM Marketing
Market Development Manager
Distribution Manager
Research Project Manager
Marketing Manager
Market Research Analysts
Advertising Manager
Public Relation Manager
Trademark Manager
Product and Innovation Manager
ADMISSIONS STARTED
Hurry Up !
For more details Contact : 9822724011, 9420546695, 9860674420, 9421271802

S.S.E. SOCIETY
SOLAPUR

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित

## संगमेश्वर महाविद्यालय (स्वायत्त) सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित,
नॅक तिसऱ्या मुल्यांकनात 3.39 CGPA प्राप्त, आणि
सोलापूर मधील पहिले स्वायत्त महाविद्यालय म्हणून नावलौकिक प्राप्त असलेल्या कॉलेजमध्ये
विद्यार्थ्यांना प्रशासकीय स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी
सोलापुरात महाविद्यालय पातळीवर पहिल्यांदाच सुरू करत आहोत.

### बी.ए (नागरी सेवा) पदवी अभ्यासक्रम

(As per UPSC/MPSC Syllabus)

(शैक्षणिक वर्ष 2021- 2022 साठी प्रवेश सुरु)

पात्रता : बारावी उत्तीर्ण (कोणतीही शाखा)

वैशिष्ट्ये :
1. महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त अभ्यासक्रम
2. तीन वर्षांचा युजीसी मान्य पदवीस्तरीय स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम
3. एकाचवेळी पदवी प्राप्ती आणि युपीएससी/एमपीएससी ची तयारी
4. तज्ज्ञ मार्गदर्शक व सातत्यपूर्ण सराव
5. भव्य सुसज्ज ग्रंथालय ,अत्याधुनिक अभ्यासिका व संगणक कक्ष
6. खासगी क्लासेसपेक्षा माफक फी

आजच कॉलेजच्या वेबसाईट www.sangameshwarcollege.ac.in ला भेट द्या.

पत्ता : 116, रेल्वे लाईन, सातरस्ता, सोलापूर- 413001
संपर्क : ऑफिस 0217- 235588 ,
भ्रमणध्वनी : डॉ. एम.एस.धोकटे 9403295144




गेल्या दीड वर्षापासून कोविड पार्श्वभूमीवर शाळा- महाविद्यालये बंद होते. मात्र शासन निर्देशानुसार पाच तारखेपासून शाळा-महाविद्यालये सुरू करण्याचा आदेश आल्यानंतर सुरक्षेचे सगळे नियम पाळून विद्यार्थ्यांचे कॉलेजच्या वतीने स्वागत करण्यात आले. आपलं कॉलेज आणि आपले शिक्षक पाहून विद्यार्थी आनंदून गेले होते. त्याप्रसंगीची कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील
काही क्षणचित्रे... उपप्राचार्य प्रसाद कुंटे व सर्व शिक्षक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे,सर्व विभागाचे समन्वयक, विद्यार्थी- शिक्षक उपस्थित होते.



# संगमेश्वरमध्ये मोफत लसीकरण शिबिराचे आयोजन

सोलापुर - राष्ट्रीय सेवा योजना विभाग संगमेश्वर कॉलेज सोलापुर आणि दाराशा नागरी आरोग्य केंद्र आणि रामवाडी आरोग्य केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने 03 दिवसीय कोविड 19 मोफत लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या लसीकरण शिबिराचे उदघाटन संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा.धर्मराज काडादी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी कॉलेजच्या प्राचार्या मा.डॉ.एस.व्ही. राजमान्य मैडम कला, विज्ञान आणि वाणिज्य या विभागाचे उपप्राचार्य, वैद्यकीय अधिकारी डॉ वाळवेकर ,डॉ पवार , प्राध्यापक, शिक्षकेतर कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, पालक, रासेयो स्वयंसेवक हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहिल्याच दिवशी लसीकरणा साठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. हे मोफत लसीकरण शिबिर दिनांक 25 ऑक्टोबर ते 27 ऑक्टोबर 2021 या कालावधीत दररोज सकाळी 10.00 ते दुपारी 02.00 वा पर्यंत आयोजित करण्यात आले. या मोफत लसीकरण शिबिराचा लाभ सर्व विद्यार्थी,पालक, प्राध्यापक,शिक्षकेतर कार्यालयीन कर्मचारी यानी घेतला.






# संगमेश्वरचे सहा खेळाडू महाराष्ट्र संघात

संगमेश्वर महाविद्यालयातील सहा राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार संस्थेचे सचिव श्री धर्मराज जी काडादी साहेब प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य, उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांच्या हस्ते करण्यात आला.

आकांशा जाधव व वैष्णवी गडदे हँडबॉल मध्ये उत्तर प्रदेश बरेली येथे झालेल्या सीनियर नॅशनल स्पर्धेत सहभाग नोंदवला , पृथ्वीराज चव्हाण व सुधन्वा मनूर हे दोघेही सब जूनियर नॅशनल हँडबॉल हैदराबाद येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदवला, निलेश वाघमारे याने जुनियर नॅशनल सॉफ्टबॉल स्पर्धेत फगवडा पंजाब येथे सहभाग नोंदविला ,व वैष्णवी सुरवसे हिने सिल्वासा गुजरात येथे झालेल्या तायक्वांदो नॅशनल स्पर्धेत गोल्ड मेडल मिळवले.

या खेळाडूंना जिमखाना चेअरमन प्रा.आनंद चव्हाण ,प्रा. संतोष खेंडे ,प्रा.विक्रांत विभुते व प्रा. शरण वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंचे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्राध्यापिका शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले

फोटो ओळी राष्ट्रीय खेळाडू समवेत संस्थेचे सचिव श्री धर्मराज जी काडादी साहेब ,प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य, उपप्राचार्य प्रसाद कुंटे ,प्रा. आनंद चव्हाण, प्रा. संतोष खेंडे,प्रा.विक्रांत विभुते व प्रा.शरण वांगी.



# खगोलशास्त्रातील आगाध माहितीचे भांडार मिळवा - व्यंकटेश गंभीर

## संगमेश्वर कॉलेज विज्ञान मंडळाचे उद्घाटन

सोलापूर ( दिनांक २६ ) '' विद्यार्थी जीवनात फक्त विज्ञानाचा अभ्यास न करता खगोलशास्त्रातील अगाध माहितीचे भांडार मिळवा. त्यासाठी जगभरातील वेगवेगळ्या शास्त्रज्ञांच्या कार्याची माहिती जाणून घ्या."असा मोलाचा सल्ला ज्येष्ठ विज्ञान अभ्यासक प्राध्यापक व्यंकटेश गंभीर यांनी दिला. ते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाच्या विज्ञान मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी खगोलशास्त्र या विषयावर बोलत होते.विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्ती पत्रकांचे अनावरण उपस्थितांच्या होते झाले.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक प्रा.मल्लिनाथ साखरे मंचावर उपस्थित होते.

प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला, त्यानंतर प्रा. सुभाष पाटील यांनी प्रास्ताविक केले, प्रास्ताविकानंतर प्रा.प्रशांत शिंपी यांनी त्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर रेडियो ॲस्ट्रॉनॉमी, रेडियो टेलिस्कोप पासून ते खगोलशास्त्रातील अनेक रंजक माहिती प्राध्यापक गंभीर यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. त्यानंतर अध्ययनातून आत्मनिर्भरतेकडे या उक्तीप्रमाणे आपचे विद्यार्थी आत्मनिर्भर होतील.असा विश्वास व्यक्त करत उप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी विज्ञान समन्वयक प्रा.रामराव राठोड,प्रा. मल्लीकार्जून वाली,प्रा.बाबुराव रणे,प्रा.चंद्रकांत हिरतोट, प्रा.सुषमा पाटील,प्रा.विशाल जत्ती,प्रा.तुकाराम साळुंके, प्रा.विश्वजित आहेरकर, प्रा.डॉ. गणेश मुडेगावकर, प्रा.संतोष पवार, प्रा.प्रियांका पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम SES.sangameshwarcollege या कॉलेजच्या यु ट्यूब चॅनेलवरून थेट प्रसारित झाला प्रा. रुपाली अंबुलगे यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा.प्रशांत पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.





# संचार

gmail.com • सोलापूर • शनिवार, २० नोव्हेंबर २०२१ www.esar

# कंपनी सेक्रेटरीज परीक्षेत 'संगमेश्वर'च्या समृद्धीचे यश

**संचार प्रतिनिधी**



**सोलापूर, दि. १९-** द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (आयसीएसआय) मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत संगमेश्वर कॉलेजच्या समृद्धी दिनदयाळ गुंड या विद्यार्थिनीने उज्ज्वल यश संपादन केले.

समृद्धीने पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश मिळविले. तिला २०० पैकी १४१ गुण मिळाले. संगमेश्वर सीए सीएस सीएमए फाउंडेशन सेलचे विनिता राठी, हनी नागदेव, सलोनी पाटील, शशिकांत बमणी, विक्रांत सुत्रावे आणि शशी करकमकर त्यांचे तिला मार्गदर्शन लाभले. बारावी परीक्षेतही श्री संगमेश्वर महाविद्यालयातून तिने उज्ज्वल यश मिळवले होते. तीच परंपरा तिने याही परीक्षेत कायम राखली आहे.

मोठी उलाढाल असलेल्या कंपन्यांमध्ये कंपनी ॲक्टनुसार कंपनी सेक्रेटरी हे पद अनिवार्य आहे. त्यामुळे या क्षेत्रात करियर करण्याची विद्यार्थ्यांना मोठी संधी आहे.

तिच्या या यशाबद्दल श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, प्राचार्य शोभा राजमान्य, उपप्राचार्य प्रा. डॉ. प्रसाद कुंटे, माजी उपप्राचार्य ए. के. हुल्ली, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, वाणिज्य समन्वयक बसय्या हणमगाव यांनी तिचे अभिनंदन केले.

# संगमेश्वर कॉलेजची उज्वल यशाची परंपरा कायम
# MHT CET परीक्षेत ५० पेक्षा अधिक विद्यार्थी उत्तीर्ण

सोलापूर ( दिनांक २८ ) : महाराष्ट्र शासन,सीईटी सेल यांच्या तर्फे घेण्यात आलेल्या MHT -CET 2021 परीक्षेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या 45 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी घवघवित यश संपादित करत कॉलेजची परंपरा कायम राखली.

अनुक्रमे यशस्वी गुणवंत -

कस्तुरे रिया 99.74
रितेश कोडम 99.7
ख्याडे अभिजीत 99.40
कुलकर्णी जान्हवी 99.32
समदूर तमन्ना 99.11
लातूरे राजन 98.73
जगताप राहुल 98.66
शिंदे श्रेयस 98.48
शिंपी वैष्णवी 98.16
पंडित यश 98.03
खोबण प्रणोती 97.40
इंगोले साई 97. 22
अभिषेक पाटील 96.99
दनाळी निवेदिता 96.35
मसलेकर श्रेया 95.8 79
बगले प्रथमेश 95.61
कुलकर्णी गौरव 95.38
कुडाळकर अक्षय 95.12
अखिलेश कुलकर्णी 94.94
परमशेट्टी निधी 94.78
गौरव पार्थ 94.74
सोनके शुभम 94.60
हचडे अस्मिता 94.19
तापडीया आचल 93.93.92
मेहता सिमरन 93.21
शाह तनिष्क 93.00
आदित्य जुनेळे 92.47
बंडगर आदित्य 92.20
निंबाळकर अथर्व 92.01
पाटील प्रसाद 91.76
मुळे समर्थ 91.00
माने प्रणव 90.97
शेट्टी जतीन 90.29 पीसीबी ग्रुपचे अनुक्रमे विद्यार्थी - आदित्य बीरगणे 99.६, माहेश्वरी मनशेट्टी 98.82 उदय पाटील 96.86 निशा हिरानंदानी 94.94 प्रथमेश लवटे 93.१२, किरण आरकेरी 92. 31 भूमिका गायकवाड 92. 29 यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री धर्मराज काडादी, प्राचार्य डॉ. सौ. शोभा राजमान्य, उपप्राचार्य श्री. प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक श्री मल्लिनाथ साखरे, विज्ञान शाखा समन्वयक श्री. रामराव राठोड, एसआयपी समन्वयक डॉ. गणेश मुडेगावकर , प्रा. शिवराज बगले प्रा. सुशांत माळवे, प्रा. अविनाश घोडके, प्रा.डॉ.अनिल देवकर आणि सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी वर्ग यांनी अभिनंदन केले.



Shri Sangameshwar Education Society's,

# SANGAMESHWAR COLLEGE, SOLAPUR

Kannada Linguistic Minority Institution
(Self Financed Division)

# C.A., C.S. & C.M.A. FOUNDATION COURSES

**C.A.** Chartered Accountant
**C.S.** Company Secretary
**C.M.A.** Cost and Management Accountant

## Our Features

- C.A., C.S. & C.M.A. Foundation Courses under one roof
- Highly Qualified & Experienced Faculty.
- Excellent Academic Results.
- Highly effective study materials.
- ICT & Case study based Teaching.
- Computer Lab for online study.
- Subject wise Professional Expert Guest Lectures.
- Library & Reading Room, Faculties.
- Timely Test Series, Doubt Solving Session & Result oriented teaching.
- Inculcating professionalism in students from the beginning.
- Professional faculties for all courses.

## HIGHLY QUALIFIED & EXPERIENCED FACULTY

| | |
|---|---|
| **CA Hunny Nagdev**<br>CA, B.Com<br>Mob: 9420625364 | **CA Vinita Rathi**<br>CA, B.Com<br>Mob : 9048788942 |
| **CA Saloni Patil**<br>CA, B.Com<br>Mob : 9922426026 | **CMA Sahil Karkamkar**<br>CMA, B.Com<br>Mob : 9552534837 |
| **CS Vikrant Sutrave**<br>CS, LLB, B.Com<br>Mob : 8698981686 | **CS Shashikant Bamani**<br>CS, B.Com<br>Mob : 9890856848 |

FOR ADMISSION CONTACT

## SANGAMESHWAR COLLEGE, SOLAPUR

Post Box. 52, Railway line, Saat Rasta, Solapur. - 413001

Ph. : 0217 2315588 • www.sangameshwarcollge.in

Co-ordinator : Prof. M.S. Sakhare, Mob. : 9420089535

# तरुणांना पोलिसातील करिअर मधून देशसेवेची संधी

**वरिष्ठ पो.नि.कमलाकर पाटील**

## संगमेश्वरमध्ये कला शाखेतील विद्यार्थ्यांशी सुसंवाद




सोलापूर ( दिनांक 16 ) " महाविद्यालयीन जीवनात योग्य दिशा सापडली की आपण पोलीस दलातील करिअर नक्की निवडा. देशसेवेसाठी पोलिसातील करिअर महत्त्वाचे आहे, या क्षेत्रातील सेवा ही उत्तम देशसेवेची संधी आहे. तरुणांनी त्याचा लाभ घ्यावा " असे प्रतिपादन वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर पाटील यांनी केले. ते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग कलाशाखा आयोजित ' पोलिसातील करिअर ' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानात बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, कला शाखा समन्वयक शिवशरण दुलंगे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

संस्थेच्या संगमेश्वर गीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. त्यानंतर सरस्वती पूजन झाले. हर्षवर्धन पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख मार्गदर्शक यांचा कॉलेजच्या वतीने सत्कार झाला.



" विद्यार्थ्यांनी बलोपासना केली पाहिजे. आहार-विहार यावरील संयमातून करिअरशी निगडित आपले व्यक्तिमत्व घडते. तरुण वयातील चालू घडामोडींवर तसेच गुन्हेगारीकडे आपले लक्ष असले पाहिजे कारण त्यापासून आपल्याला लांब राहायचा आहे. मजा म्हणून कायदा तोडण्याचा प्रयत्न करू नका, त्यातून मिळणारी ही सजा खूप मोठी असते. तुमचं करिअर खराब होऊ शकते." असा मौलिक सल्ला कमलाकर पाटील यांनी दिला.

अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी विद्यार्थ्यांना पोलीस क्षेत्रातील करिअर विषयी पाटील यांनी सांगितलेल्या गोष्टींचा नक्की फायदा होईल असं सांगत कला शाखा व्याख्यानमाला का आयोजित करत आहोत याबद्दल हेतू स्पष्ट केला.

या प्रसंगी रंगसिद्ध पाटील, संतोष पवार, शिवराज देसाई, शंकर कोमुलवार, डॉ. प्रकाश कतनळ्ळी, डॉ. विठ्ठल अरबाळे, शहाजी माने , कोमल कोंडा आदी कला शाखेतील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता.रश्मी कन्नूरकर यांनी या सूत्रसंचालन केले तर शेवटी विश्वनाथ कक्कळमेली यांनी सर्वांचे आभार मानले. संगमेश्वर कॉलेजमध्ये पोलिसातील करिअर याविषयावर बोलताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर पाटील



स्वतंत्र वृत्तपत्र
दिव्य मराठी
दिव्य सिटी
सोलापूर, मंगळवार, २१ डिसेंबर २०२१ | मार्गशीर्ष कृ.२, शके १९४३

**व्याख्यान** • 'संगमेश्वर'मध्ये क्रीडा क्षेत्रातील करिअरवर मार्गदर्शन

# मोठी स्वप्ने पाहा, ती सत्यात उतरवण्यासाठी मैदानात या!

## संचालक प्रा. डॉ. कांबळे यांचे आवाहन

**क्रीडा प्रतिनिधी | सोलापूर**



संगमेश्वर कॉलेजमध्ये व्याख्यानास उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी.



उच्च माध्यमिक स्तरावर शैक्षणिक गुणवत्ता मिळवताना क्रीडा क्षेत्रातीलही नैपुण्य महत्त्वाचे आहे. खेळातून मनाला वळण मिळते. तांत्रिक कौशल्य आत्मसात करता येते. विद्यार्थी आपल्या जीवनात प्रत्येक संकटावर मात करताना अर्थात परिस्थितीशी दोन हात करताना मोठी स्वप्ने त्यांनी पाहिली पाहिजेत. सत्यात उतरण्यासाठी क्रीडांगणावर यावे. तोच जीवन जगण्याचा खरा मार्ग आहे, असे मत कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शीचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. अनिल गहिनीनाथ कांबळे यांनी व्यक्त केले.

संगमेश्वर कॉलेजच्या कला शाखेत आयोजित क्रीडा क्षेत्रातील करिअर या विषयावरील मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रसाद कुंटे, जिमखाना विभागप्रमुख आनंद चव्हाण, भाषा समन्वयक शिवराज पाटील, कला शाखा समन्वयक शिवशरण दुलंगे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी क्रीडा क्षेत्रातील वेगवेगळी आव्हाने कोणती आहेत ? ती आव्हाने पेलण्यासाठी विद्यार्थ्यांनी कसे सक्षम राहिले पाहिजे, याबद्दल आपले मत व्यक्त करत आपल्या अध्यक्षीय भाषण केले.

संस्थेच्या संगमेश्वर गीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. प्रा. संतोष खेंडे यांनी प्रास्ताविक केले. विश्वनाथ कक्कळमेली सूत्रसंचालन यांनी केले. कोमल कोंडा यांनी आभार मानले.

### चौफेर वाचन महत्त्वाचे

क्रीडा क्षेत्रातील नोकरीच्या संधी शोधण्यासाठी चौफेर वाचन महत्त्वाचे आहे. रोजगाराच्या संधी वैविध्यपूर्ण कोणत्या क्षेत्रात आहेत? याकडे लक्ष असले पाहिजे. रेल्वे, पोलिस, सैन्य भरती, भारतीय डाक विभाग, वन विभाग, शिक्षण विभाग या क्षेत्रातील क्रीडा विभागात संधी आहेत. वैयक्तिक क्रीडा प्रकारातील नैपुण्य इथे कामी येते आणि महत्त्वाचे म्हणजे सांघिक खेळाचा भरपूर फायदा होतो.' असेही प्रा.अनिल कांबळे यांनी सांगितले.







**मोठी स्वप्ने पहा, सत्यात उतरवण्यासाठी क्रीडांगणावर या – प्रा. डॉ.अनिल गहिनीनाथ कांबळे**
**संगमेश्वर कॉलेजमध्ये क्रीडा क्षेत्रातील करिअरवर व्याख्यान**



तरुण भारत संवाद



सोलापूर : संगमेश्वर कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आरोग्य जागर शिबिरात सहभागी प्राध्यापक आणि विद्यार्थी वर्ग.

# संगमेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आरोग्य जागर शिबिर

प्रतिनिधी
सोलापूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) सोलापूर यांच्या वतीने कॉलेजमधील विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये रक्तदाब, मधुमेह आणि अन्य वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या. कॉलेजमध्ये एकूण १०० हून अधिक विद्यार्थी, शिक्षकांनी याचा लाभ घेतला. याप्रसंगी उद्घाटन सत्रात बोलताना प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य म्हणाल्या, अशा आरोग्य शिबिरातून विद्यार्थी, शिक्षकांनी तपासणी करून घेऊन डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे आपल्या जीवनशैलीत बदल करावा आणि निरामय, संपन्न जीवन जगावे.

प्रारंभी आलेल्या वैद्यकीय पथकाचे स्वागत राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने करण्यात आले. वेलनेस फोरेवर पथकातील दीपक गेंड, सुप्रिया करपे, प्रशांत माळी, आकाश वाघमोडे यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा. अण्णासाहेब साखरे यांच्या मार्गदर्शनाखाली अनिकेत फताटे, बाळासाहेब कांबळे, अनन्या कोळी, उषा बामणे, महांतेश देसाई, अर्पिता बंगेरा या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसह कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी शिबीर यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

तरुण भारत संवाद

# मातृभूमीच्या सेवेची एनसीसीमधून संधी

## ब्रिगेडियर आर. के. गायकवाड : क्रीडा संकुलातील एनसीसी विभागात सैनिक संवाद



सोलापूर : एनसीसी सैनिक संवाद कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी बोलताना ब्रिगेडियर आर. के. गायकवाड.

प्रतिनिधी

सोलापूर

एनसीसीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देशसेवेची मोठी संधी उपलब्ध आहे, त्यामुळे नॅशनल कॅडेट कोअरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपले व्यक्तिमत्व घडवताना शैक्षणिक आलेख देखील तेवढाच उंचावला पाहिजे. कंबाइनड डीफेन्स सर्विस यांच्यासोबतच सर्विस सेलेक्शन बोर्ड यांच्या परीक्षादेखील युपीएससीच्या दर्जाच्या असतात त्या स्पर्धा परीक्षांचा लाभ उठवत विद्यार्थ्यांनी देशसेवा करावी, असे प्रतिपादन पुणे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर आर. के. गायकवाड यांनी केले. ते कुमठा नाका येथील क्रीडा संकुल येथे सैनिक संवाद दरबाराच्या कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी कर्नल एस.के. चव्हाण, कर्नल वासुदेवन उपस्थित होते.

ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात आपल्या शैक्षणिक गुणवत्तेकडे लक्ष दिले पाहिजे. कला वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनो आपल्या विषयात पारंगत व्हा. इतर शैक्षणिक उपक्रमात देखील हिरीरीने सहभाग नोंदवा. इंग्लिश कम्युनिकेशन, चालू घडामोडी, स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, कायदा व सुव्यवस्था या सगळ्या बाबींचा सखोल अभ्यासही महत्वाचा आहे. या सुसंवाद कार्यक्रम प्रसंगी मेजर चंद्रकांत हिरतोट, कॅप्टन व्हनमाने, कॅप्टन एस. के. पाटील, लेफ्टनंट शिल्पा लब्बा , ९ महाराष्ट्र एनसीसी बटालियन ,३९ बटालियनचे सर्व कर्मचारी आणि संगमेश्वर महाविद्यालयातील एनसीसी कॅडेटस उपस्थित होते.

**संगमेश्वर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व कोवीड प्रतिबंधक लसीकरणाचे आयोजन याची बातमी या लिंकवर**

https://youtu.be/4wLRjkpcoAc

YouTube

# सीएमए परीक्षेत संगमेश्वर कॉलेजच्या सात विद्यार्थ्यांचे यश

सोलापूर (प्रतिनिधी) दी इंस्टीट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंटंट ऑफ इंडिया (आयसीएआय) मार्फत घेण्यात आलेल्या सीएमए फाउंडेशन परीक्षेत संगमेश्वर कॉलेजच्या स्वप्निल नंदकुमार माशाळ,शिवराज संगण्णा कापसे,हर्ष सिद्धेश्वर शिवगुंडे ,भीम अर्जुन सोनके ,इंद्रजीत ज्ञानेश्वर डोके,कृष्णा दयानंद जांगडेकर या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केलं. पहिल्याच प्रयत्नात या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. संगमेश्वर सीए, सीएस, सीएमए फाउंडेशन सेलचे विनिता राठी, हनी नागदेव, सलोनी पाटील, शशिकांत बमणी, विक्रांत सुत्रावे आणि साहिल करकमकर यांचे यांना मार्गदर्शन लाभले.

यशाबद्दल श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी, प्राचार्य शोभा राजमान्य, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, माजी उपप्राचार्य आनंद हुली, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, वाणिज्य समन्वयक बसय्या हंणमगाव, सर्व शिक्षक यांनी या उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या



# परीक्षेला जाताना योग्य व्यवस्थापन महत्त्वाचे

## उपायुक्त धनराज पांडे

सोलापूर ( दिनांक 24 प्रतिनिधी ) "परीक्षेला जाताना अभ्यासासह इतर बाबींचे योग्य व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. कोविडच्या काळात उद्भवलेली परिस्थिती ही मानसिक ताण निर्माण करणारी असली, तरी प्रयत्नपूर्वक सकारात्मक विचाराने आपण परिक्षेला सामोरे गेले पाहिजे. महाविद्यालयीन जीवनात समाज माध्यमांचा सीमित वापर आणि चांगल्या मित्रांची संगत करावी." असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महापालिकेचे उपायुक्त धनराज पांडे बोलत होते. मंचावर प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य,उपप्राचार्य प्रा. प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक प्रा.मल्लिनाथ साखरे, शास्त्र समन्वयक प्रा.रामराव राठोड, भाषा समन्वयक प्रा. शिवराज पाटील, शिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते. ते संगमेश्वर कॉलेज राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित केलेल्या लसीकरण आणि १२वीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कार्यक्रमात बोलत होते.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी लसीकरण शिबिराच्या निमित्ताने पांडे यांनी कॉलेजला भेट दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला.

त्यानंतर ग्रंथालय विभागात लसीकरण शिबीर झाले.इथं प्रारंभी उपप्राचार्य प्रा. प्रसाद कुंटे यांनी प्रास्ताविकात लसीकरणाचा उद्देश सांगितला. त्यांनर सचिव धर्मराज काडादी, उपायुक्त धनराज पांडे, प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य यांच्या उपस्थितीत लसीकरण शिबिराचे उद्घाटन झाले. संगिता पाटील आणि त्यांच्या वैद्यकीय पथकाच्या साहाय्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे लसीकरण झाले. या शिबिरात कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

शिबीर यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, प्रा. हर्षवर्धन पाटील, प्रा.एस.बी. साखरे, प्रा.विशाल जत्ती, प्रा.प्रकाश कतनळे, विजयकुमार मुलीमनी, संतोष कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रा. हर्षवर्धन पाटील यांनी केले तर आभार प्रा.मल्लिनाथ साखरे यांनी मानले.



Shri Sangameshwar Education Society's

# SANGAMESHWAR COLLEGE, SOLAPUR

S.S.E. SOCIETY SOLAPUR
"Work is Worship"

• Linguistic Minority Institute •
• Self Financed Division •

## SANGAMESHWAR NEET, IIT-JEE, MH-CET CELL

Announces

## SCHOLARSHIP CUM ENTRANCE TEST – 2022

For 10th Appeared Students

Date of Examination (s): 12th April 2022 Tuesday

Date of Examination (s): 15th April 2022 Friday

JEE/NEET/CET /NATA Batch 2022-2023

Two Years Classroom Program for Competent Students of Std. 10th aspiring for IIT-JEE. NEET, AIIMS, NATA & CET

### Syllabus & Examination Pattern

| Syllabus : | *Examination Pattern: |
|---|---|
| 9th & 10th Std. (State & CBSE Syllabus) | Multiple Choice Questions : No Negative Marking<br>Total 100 Marks Physics, Chemistry, Mathematics & Biology 25 Questions each |

For Exam Seat No., Hall Ticket & Result Declaration
Visit www.sangameshwarcollege.in
Result : 18th April 2022

**Online :** Online Registration: www.sangameshwarcollege.in

**Last Date of Registration : 10 April, 2022**

**Offline :** Forms are available in Sangameshwar Public School (Pre-Primary Section ) Opposite To Big Bazar

**Exam Venue :** Sangameshwar College, Solapur : Reporting Time: 12:15 pm

Examination Time : 12:30 to 2:30 pm

Seminar for Parents & Students After Examination

Admission to JEE/NEET/CET / NATA Batch through Entrance Exam only.

For More Details Contact
Pravin Sir 9096271201
Dr. Ganesh Mudegaonkar 9421440940


Shree Sangameshwar Education Society's
SANGAMESHWAR COLLEGE, SOLAPUR
Kannada Linguistic Minority Institution
(Self Financed Division)
SHREE S. E. SOCIETY SOLAPUR
Work is worship
C.A., C.S. & C.M.A.
Foundation Courses
"A Gateway to lead the Corporate World"
Who can Apply..?
11th / 12th and graduate perusing students of any stream.
Other than Sangameshwar college student also join this course
Foundation exam attempted students Can (repeaters) also apply.
Pursuing B.com-I or any First year graduate Can also apply.
Offline and online teaching, beneficial for out of City students.
Students career counselling available for better career in commerce.
Our Results Is Our Identity ...!!
Foundation Exam Qualified Students In Nov/Dec-2021 Attempt
CA FOUNDATION
Samarth Kadam
CS FOUNDATION
Samruddhi Gund
CMA FOUNDATION
Swapnil Mashal
Shivraj Kapase
Harsh Shivgunde
Bhim Sonake
Indrajit Doke
Krishna Jangdekar
Diksha Gaikwad
वाणिज्य क्षेत्रातील उत्तम करिअरसाठी
११ वी व १२ वी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी
C.A. Chartered Accountant
C.S. Company Secretary
C.M.A. Cost and Management Accountant

S.S.E. SOCIETY
SOLAPUR
"Work is Worship"

Shri Sangameshwar Education Society's

# SANGAMESHWAR COLLEGE, SOLAPUR

**SIP: Sangameshwar JEE, NEET, NATA & CET CELL**

**SIP XI SCIENCE : INTEGRATED BATCH 2022-2024**

**Two Years** Complete Integrated Program

**Batch Begins** From 21 April 2022

History of Consistent Results in IIT – JEE NEET, MH-CET Examinations

Our Result Is Our Identity

**Why SIP: SANGAMESHWAR JEE, NEET, CET Cell?**

- All Key Concept Covered Across all Subjects: PCMB.
- Separate Batches For JEE, NEET & CET Exam Preparation.
- Separate Attention To Board (HSC) Exam.
- Specially Designed Research Based Study Material: JEE, NEET & CET.
- Expert & Experienced Faculty Members.
- Offline Classes: Online / Offline Practice Tests.
- Daylong Supervised Study Sessions: Every Day 1.5 Hrs. (Per Subject), 6 Days Teaching.
- Daily Doubt Clearing Session, DPP, Weekly Tests, Topic wise & Complete Syllabus Tests.
- Previous Years Question Paper Discussion.
- Mobile App. For Online Tests & Continues Feedback Mechanism.
- Result Analysis, Parents Meeting, Open House, Motivational Lectures.

SIP : SANGAMESHWAR JEE, NEET, NATA, CET CELL
Sangameshwar College, Solapur

**For More Details Contact**

Pravin Sir 9096271201

Dr. Ganesh Mudegaonkar 9421440940

Shri Sangameshwar Education Society's

# SANGAMESHWAR COLLEGE, SOLAPUR

S.S.E. SOCIETY
SOLAPUR
"Work is Worship"

• Linguistic Minority Institute •
• Self Financed Division •

## SANGAMESHWAR NEET, IIT-JEE, MH-CET CELL

Announces
**SCHOLARSHIP CUM ENTRANCE TEST – 2022**
For 10th Appeared
**CBSE & State Board Students**

**JEE/NEET/CET /NATA Batch 2022-2023**
*Two Years Classroom Program for Competent Students of*
Std. 10th aspiring for
IIT-JEE. NEET, AIIMS, NATA & CET

Date of Examination (s)

| 25th May 2022 Wednesday | 1st June 2022 Wednesday |
|---|---|

### Syllabus & Examination Pattern

| Syllabus : | *Examination Pattern: |
|---|---|
| 9th & 10th Std. (State & CBSE Syllabus) | Multiple Choice Questions : No Negative Marking<br>Total 100 Marks Physics, Chemistry, Mathematics & Biology 25 Questions each |

*For Exam Seat No., Hall Ticket & Result Declaration*
*Visit www.sangameshwarcollege.in*
*Result : 5th June 2022*

**Online :**
Online Registration:
www.sangameshwarcollege.in

**Last Date of Registration : 31 May, 2022**

**Offline :** Forms are available in
Sangameshwar Public School
(Pre-Primary Section ) Opposit Big Bazar,
Saat Rasta, Solapur

**Exam Venue :** Sangameshwar Public School (Pre-Primary Section ) , Opposit Big Bazar, Saat Rasta, Solapur

Examination Time : 12:30 to 2:30 pm ■ Reporting Time: 12:15 pm

Seminar for Parents & Students After Examination

Admission to **JEE/NEET/CET / NATA Batch** through Entrance Exam only.

For More Details Contact
Pravin Sir 9096271201
Dr. Ganesh Mudegaonkar 9421440940





S.S.E. SOCIETY
SOLAPUR
"Work is Worship"

Shri Sangameshwar Education Society's

**SANGAMESHWAR COLLEGE, SOLAPUR**

SIP: Sangameshwar JEE, NEET, NATA & CET CELL

**SIP XI SCIENCE : INTEGRATED BATCH 2022-2024**

History of Consistent Results in IIT – JEE NEET, MH-CET Examinations

Our Result Is Our Identity

Why SIP: SANGAMESHWAR JEE, NEET, CET Cell?

- All Key Concept Covered Across all Subjects: PCMB.
- Separate Batches For JEE, NEET & CET Exam Preparation.
- Separate Attention To Board (HSC) Exam.
- Specially Designed Research Based Study Material: JEE, NEET & CET.
- Expert & Experienced Faculty Members.
- Offline Classes: Online / Offline Practice Tests.
- Daylong Supervised Study Sessions: Every Day 1.5 Hrs. (Per Subject), 6 Days Teaching.
- Daily Doubt Clearing Session, DPP, Weekly Tests, Topic wise & Complete Syllabus Tests.
- Previous Years Question Paper Discussion.
- Mobile App. For Online Tests & Continues Feedback Mechanism.
- Result Analysis, Parents Meeting, Open House, Motivational Lectures.

SIP : SANGAMESHWAR JEE, NEET, NATA, CET CELL
Sangameshwar College, Solapur

For More Details Contact

Pravin Sir 9096271201
Dr. Ganesh Mudegaonkar 9421440940


संगमेश्वर कॉलेज सोलापूर

**कॉलेजच्या यूट्यूब चॅनेलला अवश्य भेट द्या**

https://www.youtube.com/c/SESSangameshwarCollege/channels




**संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त)सोलापूर मराठी विभाग मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित व्याख्यान** २२ जाने २०२२ रोजी झाले.
**वक्ते – प्रा.डॉ. पुरुषोत्तम काळे (संपादक ,महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे )**
**विषय – मराठी भाषा : समृद्धी आणि संधी या कार्यक्रमाचे थेट प्रसारण**
SES.SangameshwarCollege या कॉलेजच्या यूट्यूब चैनल वरून प्रसारित झाले.
त्याची लिंक https://youtu.be/jn9A8AUyghk






**मराठी भाषा गौरव दिन तथा कुसुमाग्रज जयंती आणि कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी स्मृतिदिन यानिमित्त पूर्वसंध्येस दूरदृश्यप्रणालीद्वारे आयोजित व्याख्यान झाले त्या संपूर्ण कार्यक्रमाची लिंक - https://youtu.be/rkU8-j9K2Yk**

